# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.07.2026** **वारःबुधवार**

---

1. भारत-इंडोनेशियाच्या संयुक्त निवेदनात सर्व प्रकारच्या दहशतवादाचा तीव्र निषेध
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी रवाना होणार
3. पंतप्रधान कार्यालयाच्यावतीनं घेण्यात आलेल्या उच्चस्तरीय बैठकीत विविध क्षेत्रांवर होणाऱ्या एल निन्योच्या संभाव्य परिणामांचा आढावा
4. 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक 2026' ला राज्य विधानपरिषदेतही एकमताने मंजुरी आणि
5. भारत आणि इंग्लंड दरम्यान सुरू असलेल्या टी-20 क्रिकेट मालिकेत तिसऱ्या सामन्यांत यजमान संघाचा भारतावर विजय

**<u>भारत-इंडोनेशिया</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्यात काल जाकार्ता इथं झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात दोन्ही देशांनी कुठल्याही स्वरुपातील दहशतवादाचा तीव्र निषेध केला आहे. दहशतवादाच्या या धोक्याचा सामना करण्यासाठी जगभर आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार निर्णायक आणि समन्वयानं प्रयत्न करण्याची गरज निवेदनात व्यक्त केली आहे. तसंच संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या निर्बंध समितीनं घोषित केलेले दहशतवादी आणि दहशतवादी संघटनांच्या विरोधात जागतिक पातळीवर कारवाई व्हावी असं आवाहनही पंतप्रधान मोदी आणि अध्यक्ष सुबियांतो यांनी निवेदनात केलं असून दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुता धोरण अवलंबण्याचाही स्पष्ट पुनरुच्चार केला आहे. दहशतवाद आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारी यांच्यातील लागेबांधे लक्षात घेऊन यासंदर्भात देशांतर्गत तसंच आंतरराष्ट्रीय कायद्यातील सर्वोत्तम पद्धतींचा वापर करून माहितीची देवाणघेवाण करण्याचाही भारत आणि इंडेनेशियानं एकमतानं निर्धार व्यक्त केला आहे. इंडोनेशियाचे अध्यक्ष प्रबोवो सुबियांतो यांच्या समवेत झालेल्या शिष्टमंडळ स्तरीय चर्चेत द्विपक्षीय संबंधांच्या सर्व पैलूंचा आढावा घेण्यात आला.

तत्पूर्वी पंतप्रधानांनी काल इंडोनेशियाच्या संसदेला संबोधित करताना भारत आणि इंडेनेशिया यांच्यातील धोरणात्मक भागीदारी आणखी बळकट होण्याची गरज व्यक्त केली. ही भागीदारी दृढ झाल्यास तिचं दोन्ही देशांच्या भरभराटीतच नव्हे तर प्रादेशिक तसंच जागतिक शांतता आणि स्थैर्यातही मोठे योगदान राहील असंही पंतप्रधान मोदींनी नमूद केलं. भारत विस्तारवादाचा नाही तर विकासाचा मार्ग अनुसरत असल्याचं ते म्हणाले. पंतप्रधानांनी काल जाकार्ता इथं एका कार्यक्रमात भारतीय समुदायालाही संबोधित केलं. आज ते इंडोनेशियाच्या अध्यक्षांसमवेत योग्यकर्ता इथल्या प्रसिद्ध प्रंबानन मंदिराला भेट देणार आहेत. नवव्या शतकात बांधण्यात आलेलं हे प्राचीन मंदिर भारताचे इंडोनेशियाबरोबर हजारो वर्षांपासूनच्या दृढ सांस्कृतिक संबंध असल्याचा पुरावा आहे.

**<u>पंतप्रधान ऑस्ट्रेलिया दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन देशांच्या दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात आज ऑस्ट्रेलियातील मेलबर्न इथं पोहोचतील. तीन दिवसांच्या या दौऱ्यात ते ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान अँथनी अल्बानीज यांच्यासोबत भारत-ऑस्ट्रेलिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होणार असून, 'भारत-ऑस्ट्रेलिया सीईओ  फोरम'मध्येही सहभागी होणार आहेत. तसंच भारतीय समुदायाशीही ते संवाद साधतील.

**<u>जयशंकर</u>**

भारत आणि बहारीन यांच्यातील सहकार्य अधिक दृढ होत असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी काल बहारीन इथं केलं. दोन दिवसांच्या बहारीनच्या दौऱ्यात जयशंकर यांनी बहारीनचे युवराज आणि पंतप्रधान राजे सलमान बिन हमद अल खलिफा यांच्या उपस्थितीत बहारीनचे राजे हमद बिन इसा अल खलिफा यांची भेट घेतली. तसंच उपपंतप्रधान शेख खालिद बिन अब्दुल्ला अल खलिफा यांचीही स्वतंत्रपणे भेट घेतली. या भेटीत जयशंकर यांनी उभय देशांदरम्यानची दीर्घकालीन आणि मैत्रीपूर्ण द्विपक्षीय भागीदारी अधिक दृढ करण्यासाठी भारताची कटिबद्धता अधोरेखित केली. तसंच बहारीनमध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीय समुदायाची सुरक्षा सुनिश्चित केल्याबद्दल नेत्यांचे आभारही मानले. परराष्ट्र मंत्री सध्या अकरा दिवसांच्या आखाती देशांच्या दौऱ्यावर आहेत. बहारीनचा दौरा आटोपून ते आज कुवेतला दाखल झाले आहेत.

**<u>पीएमओ एल निन्यो</u>**

एल निन्योचा विविध क्षेत्रांवर होणारा संभाव्य परिणाम आणि त्याला तोंड देण्यासाठी करण्यात आलेल्या तयारीच आढावा घेण्यासाठी काल पंतप्रधान कार्यालयाच्यावतीनं उच्चस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. पंतप्रधानांचे प्रधान सचिव डॉक्टर पी. के मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली सेवा तीर्थ इथं झालेल्या बैठकीला 15 हून अधिक मंत्रालयांचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. एल निन्योचा मान्सूनवर किंवा त्याच्या आगमनाला झालेल्या विलंबाचा अवर्षणप्रवण जिल्ह्यांवर होणाऱ्या परिणामावर सतत लक्ष ठेवावे, त्यावर वेळीच योग्य उपाययोजना करण्याच्यादृष्टीनं राज्यांशी समन्वय ठेवून त्याचे मूल्यमापन करावं, अशा सूचना डॉ. मिश्रा यांनी यावेळी दिल्या. या बैठकीत भारतीय हवामान विभागाच्या अधिकाऱ्यांनी जून आणि जुलै महिन्यातील कालपर्यंतच्या पावसाच्या एकंदर स्थितीबाबत सादरीकरण केलं. जुलैच्या पहिल्या आठवड्यात सर्वसाधारणपेक्षा अधिक पाऊस झाल्याचं दिसून आल्याचं यावेळी सांगण्यात आलं.

**<u>अमेरिका इराण हल्ले</u>**

होर्मुझच्या सामुद्रधुनीत तीन व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांनंतर काही तासातच अमेरिकी सैन्यानं इराणवर नव्यानं हल्ले केले आहेत. आंतरराष्ट्रीय जलमार्गावरून निरपराध नागरिकांना घेऊन जाणाऱ्या व्यापारी जहाजांना लक्ष्य करून त्यांच्यावर हल्ले केल्याची इराणला मोठी किंमत चुकवणं भाग पडावी, यासाठी अमेरिकेच्या लष्करी तुकड्यांनी हे हल्ले केल्याचं, अमेरिकन सेंट्रल कमांडनं समाज माध्यमावर पोस्ट केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. अमेरिकी लष्कराकडून इराणची हवाई संरक्षण यंत्रणा, किनारपट्टीवर पाळत ठेवणारी यंत्रणा, जमिनीवरून हवेत मारा करणारी क्षेपणास्त्रं, तसंच जहाजांवर मारा करणारी क्रूझ क्षेपणास्त्रं आणि ड्रोनच्या प्रक्षेपणस्थळांना लक्ष्य करण्यात येत आहे, असं एका अमेरिकी अधिकाऱ्यानं सांगितलं. इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांनी दिलेल्या बातमीत केशम आणि बंदर अब्बास इथं स्फोटांचे आवाज ऐकू आल्याचं म्हटलं आहे.

**<u>पुरी-विभा कॉन्क्लेव्ह</u>**

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या किंमती स्थिर राहिल्यास किंवा त्यामध्ये घट झाल्यात देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरांमध्ये सकारात्मक बदल होण्याची शक्यता पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू विभागाचे मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी व्यक्त केली आहे. नवी दिल्ली इथं काल विकसित भारत कॉन्क्लेव्ह 2026 मध्ये ते बोलत होते. भारतानं अलीकडच्या काळातील सर्वात आव्हानात्मक ऊर्जा संकटातून यशस्वीपणे मार्ग काढल्याचंही पुरी यांनी सांगितलं.

**<u>इथेनॉल गडकरी</u>**

इथेनॉल मिश्रित इंधन कार्यक्रमाचे आर्थिक आणि पर्यावरणीय फायदे होत असून, ते वैज्ञानिकदृष्ट्याही सिद्ध झाल्याचं सांगत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी या कार्यक्रमाचं समर्थन केले. दिल्लीत आयोजित विकसित भारत परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. या प्रकारच्या इंधनामुळे नुकसान झालेले वाहन दाखवून द्यावे असं आव्हान त्यांनी यावेळी टीकाकारांना दिलं. अशा कोणत्याही घटनेची नोंद झाली नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले. ऊर्जा सुरक्षेचे लक्ष्य साध्य करण्यासाठी आणि जीवाश्म इंधनाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी पर्यायी जैव इंधनाला प्रोत्साहन देण्याची गरज त्यांनी यावेळी व्यक्त केली. पर्यायी इंधनाच्या अधिक वापरामुळे पर्यावरणीय फायद्यांसह, आयात घटणे, रोजगार संधींची निर्मिती तसंच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी नमूद केलं.

**नर्मदा पाणी वाटप**

नर्मदा प्रकल्पाच्या संदर्भातील वीस वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटला असून महाराष्ट्राला दहा टीएमसी पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नर्मदा प्रकल्पाच्या प्रलंबित प्रश्नांबाबत काल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश आणि राजस्थान या चार राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या पाण्यापैकी पाच टीएमसी पाणी उकाई धरणातून उचलण्याबाबतही अनुकूल निर्णय घेण्यात आला असून यासाठी महाराष्ट्र सरकार सुव्यवस्थित आराखडा तयार करत असल्याचं सांगत या पाण्याचा उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होणार आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

**महाराष्ट्र विधिमंडळ**

महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र शेतकरी म्हणून कायदेशीर मान्यता देणारं 'महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक 2026' काल राज्य विधानपरिषदेतही एकमताने मंजूर करण्यात आलं.

ऑर्केस्ट्रा आणि करमणूक परवान्याच्या नावाखाली डान्सबार चालवण्याच्या कारभाराला आळा घालण्यासाठी कायद्यात सुधारणा करणाऱ्या डान्सबार विधेयकालाही काल महाराष्ट्राच्या विधानसभेत मंजुरी देण्यात आली.

राज्यात खाजगी सावकारांना आळा घालण्यासाठी आणि त्यातून होणारी शेतकऱ्यांची फसवणूक टाळण्यासाठी सावकारी सुधारणा विधेयक काल विधानसभेत मंजूर करण्यात आलं. या नवीन विधेयकानुसार खाजगी अर्थात परवाना नसणाऱ्या सावकारांना पूर्वी असणारी पन्नास हजार रुपये दंडाची रक्कम आता एक लाखांवर नेण्यात आली असून पाच वर्ष कारावासाची शिक्षा आता सात वर्ष इतकी करण्यात आली आहे.

**फुटबॉल**

फिफा विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत स्वित्झर्लंडनं कोलंबियाला 4-3 अशा गोलने पराभूत करत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. 1954 नंतर स्वित्झर्लंड पहिल्यांदा विश्वकरंडकाच्या उपांत्यपूर्व फेरीत पोहोचला आहे. राउंड ऑफ 16च्या दुसऱ्या सामन्यात अर्जेंटिनाने इजिप्तला 3-2 असे नमवलं.

**क्रिकेट**

पुरुषांच्या क्रिकेटमध्ये भारत आणि इंग्लंड दरम्यान सुरू असलेल्या टी-20 क्रिकेट मालिकेत भारताला काल इंग्लंडकडून पराभव पत्करावा लागला. इंग्लंडने दिलेल्या 202 धावांचं लक्ष्य पार करताना भारत सर्वबाद 76 धावाच करू शकला.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.